परिशिष्ट १ - आधार संमती फॉर्म (प्रपत्र)

प्रति,

शाखा व्यवस्थापक,

---------------------- शाखा,

महोदय,

संदर्भ : आधार माहितीसाठी संमती

1. मला तुमच्या बँकेमध्ये ---------- खाते (खाती) उघडायचे आहे. खाते उघडण्याच्या प्रक्रियेचा भाग आणि केवायसी कागदपत्रांच्या स्वरूपात मी माझा आधार क्रमांक सादर करीत आहे आणि स्वेच्छेने पुढील गोष्टींसाठी माझी संमती देत आहे :

   - यूआयडीएआय (UIDAI) कडून माझ्या अधिकृतीकरण (पडताळणी) करून घेण्यासाठी माझा आधार तपशील वापरणे
   - माझा खाली नमूद केलेला मोबाइल क्रमांक मला एसएमएस एलर्ट पाठवण्यासाठी वापरणे
   - आधार क्रमांक माझ्या तुमच्या बँकेतील सध्याच्या/ नवीन/ भविष्यातील सर्व खात्यांना आणि कस्टमर प्रोफाइल (सीआयएफ) ला जोडणे
   - माझ्या आधार क्रमांकाचा केवायसीचा एक भाग म्हणून उपयोग करणे परंतु यूआयडीएआय (UIDAI) कडून अधिकृतीकरण/पडताळणी करून न घेणे

   अधिकृतीकरणानंतर जी माहिती इतरांना दिली जाईल त्याचे स्वरूप मला समजावून सांगण्यात आलेले आहे. मला असे सांगण्यात आलेले आहे की बँकेकडे याबरोबर सादर केलेली माझी माहिती वर नमूद केलेल्या उद्देशाव्यतिरिक्त किंवा कायद्याच्या आवश्यकतेखेरीज इतर कोणत्याही उद्देशासाठी वापरली जाणार नाही.

2. मी, याद्वारे, घोषित करतो/ करते की मी वर स्वेच्छेने दिलेली सर्व माहिती खरी, बरोबर आणि संपूर्ण आहे.

आपला/आपली विश्वासू,

नाव: ________________________________

मोबाइल क्रमांक: __________________________

इमेल: ________________________________

अर्जदाराची सही

किंवा

अंगठ्याचा ठसा

तारीख: ____ /____ /_____

---

अर्जदाराने (अर्जदारांनी) देण्याचे घोषणापत्र/हमीपत्र

---

मी/आम्ही पुष्टी देतो की मी/आम्ही भारताचा/भारताचे रहिवासी आहे /आहोत. मी/आम्ही पुष्टी देतो की मी/आम्ही XXXXXXXXXXXXXXXXX यांचेकडे खाते उघडण्यावर आणि विविध सेवा, ज्यांमध्ये एटीएम, फोन बँकिंग, डेबिट कार्डे, मोबाइल बँकिंग, नेट बँकिंग, इमेल स्टेटमेंटस इ. यांचा समावेश आहे परंतु ते त्यांपुरतेच मर्यादित नाही, यांवर नियंत्रण करणाऱ्या अटी व शर्ती वाचलेल्या आहेत, त्या मला/आम्हाला समजलेल्या आहेत आणि याद्वारे त्यांचे पालन करण्याचे मान्य करीत आहे/ करीत आहोत. अटी व शर्तीमध्ये वेळोवेळी केले जाणारे सर्व बदल आणि बँकेद्वारे देण्यात येणाऱ्या सेवांच्या बाबतीत बँकेच्या सूचनाफलकावर/ वेबसाइटवर निर्देशित केल्याप्रमाणे किंवा मला कळवण्यात आल्याप्रमाणे केलेले बदल, ज्यात या फॉर्ममध्ये (प्रपत्रात) नमूद केलेल्यांचा समावेश आहे परंतु ते त्यांपुरतेच मर्यादित नाही, माझ्यावर/ आमच्यावर बंधनकारक असतील. मी/आम्ही मान्य करीत आहोत की बँक त्यांच्या संपूर्ण अधिकारात, मला/आम्हाला कोणतीही सूचना न देता यांपैकी कोणत्याही सेवा संपूर्णपणे किंवा अंशत: खंडित करू शकते. मी/आम्ही मान्य करीत आहोत की वेळोवेळी लागू होणारे सेवा शुल्क (सर्विस चार्जेस) बँक माझ्या खात्याला नावे टाकू शकेल. कागदपत्रे आणि खाते उघडण्याच्या फॉर्म (प्रपत्र)च्या अतिरिक्त, बँक खाते उघडण्याचा अर्ज स्वीकारण्याचा/नाकारण्याचा हक्क राखून ठेवत आहे. या बाबतीतील बँकेचा निर्णय अंतिम असेल. दुसऱ्या जागी गेल्यामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे पत्त्यात बदल झाल्यास, मी/आम्ही असा बदल झाल्यापासून २ आठवड्यांच्या आत बँकेला नवीन पत्ता, पत्त्याच्या वैध पुराव्यासह, कळवू. मी / आम्ही घोषित करतो की जोडलेल्या खात्यामधील व्यवहार माझ्या/आमच्या कायदेशीर स्रोतांमधूनच केले जातील आणि खात्याचा उपयोग कोणत्याही बेकायदेशीर उद्देशासाठी केला जाणार नाही. मी/आम्ही कोणत्याही अफरातफरीचा, असल्यास, लवकरात लवकर शोध लागण्यासाठी दररोजच्या व्यवहारांवरही लक्ष ठेवू. मी/आम्ही याद्वारे घोषित करतो की वर दिलेली माहिती माझ्या ज्ञानानुसार खरी व बरोबर आहे. मला/आम्हाला माझी वैयक्तिक माहिती/ केवायसी माहिती मध्यवर्ती केवायसी रजिस्ट्रीला देण्याची इच्छा आहे.

रजिस्ट्रीला कॉल करू नका: मी/आम्ही "टेलिफोन/मोबाइल/एसएमएस/इमेल" द्वारे बँकेकडून/त्यांच्या एजंटांकडून विक्रीच्या उद्देशासाठी माहिती/सेवा इ. मिळवण्यास संमती देत आहोत/ संमती देत नाही. मी/आम्ही हे मान्य करीत आहोत व आम्हाला हे समजते की 'डू नॉट कॉल (कॉल करू नका)' च्या नोंदणीसाठी फक्त थेट टेलिफोन क्रमांक (ऑफिसेस/ कॉर्पोरेटस/ मालक यांचे बोर्डवरील/ जनरल टेलिफोन क्रमांक नव्हे) स्वीकारले जातील. मला/ आम्हाला याची जाणीव आहे की नोंदणीनंतर, मला/आम्हाला नोंदणीसाठीची विनंती बरोबर असल्याची पडताळणी करण्यासाठी बँकेकडून कॉल (फोन) येऊ शकतो.